दैनिक
कोकण किनारा
रत्नागिरी

कार्तिकी एकादशी

शनिवार दि. २१ नोव्हेंबर २०२६



थोडक्यात



डंपरचा ब्रेक निकामी होऊन अपघात; चालक सुखरूप

रत्नागिरी : रत्नागिरीनागपूर महामार्गावरील टाक्याचा माळ परिसरात रवी इन्फ्रा कंपनीच्या डंपरचा ब्रेक निकामी झाल्याने अपघात घडला. या घटनेत चालक प्रकाश यांना केवळ किरकोळ खरचटले असून ते सुखरूप आहेत. इंजिनियर यतीचंद्र पांडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, वाहनाचा ब्रेक निकामी झाल्यामुळे चालकाचे नियंत्रण सुटून हा अपघात झाला. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही; मात्र या घटनेमुळे परिसरातील प्रवाशांच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. देवळे फाटा येथून या महामार्गावर तीव्र आणि लांब उतार सुरू होत असल्याने वाहनांचा वेग वाढून ब्रेक निकामी होण्याचे प्रकार यापूर्वीही येथे घडले आहेत. हा पट्टा अपघातप्रवण बनल्याने संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी संबंधित यंत्रणेने तातडीने ठोस सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी वाहनचालक व स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

देवरुख तेलीवाडीत जुन्या वादातून एकास बेदम मारहाण; ५ जणांवर गुन्हा दाखल

देवरुख : जुन्या तक्रारीचा व वादाचा राग मनात धरून दुचाकीवरून घरी जाणाऱ्या तरुणाला अडवून लाकडी दांडके व ॲल्युमिनियमच्या काठीने बेदम मारहाण करण्यात आल्याची घटना संगमेश्वर तालुक्यातील देवरुख तेलीवाडी येथे घडली. या मारहाणीत तरुणाचा उजवा हात फ्रॅक्चर झाला असून देवरुख पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रोहित हरिश्चंद्र किर्वे (वय ३७, रा. देवरुख तेलीवाडी, ता. संगमेश्वर) असे जखमी फिर्यादीचे नाव आहे. ते १९ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास नटेवाडी हरपुडे ते तेलीवाडी जाणाऱ्या रस्त्यावरील गणपती विसर्जन घाटापुढील गल्लीतून आपल्या दुचाकीवरून घरी जात होते. यावेळी समिक्षा सतिष किर्वे व सुगंधा सुरेश किर्वे यांनी त्यांना अडवून लाकडी दांडक्याने पाठीवर व मानेवर मारहाण केली. त्यानंतर सतिष सुरेश किर्वे, राजेंद्र सुरेश किर्वे आणि महेश सुरेश किर्वे (सर्व रा. तेलीवाडी, देवरुख) हे त्या ठिकाणी आले आणि त्यांनी लाकडी काठी व ॲल्युमिनियमच्या काठीने रोहित यांच्या कमरेवर, दोन्ही हातांवर आणि पाठीवर मारहाण केली. तसेच जमिनीवर पाडून छातीवर लाथ मारली. या हल्ल्यात रोहित यांचा उजवा हात फ्रॅक्चर झाला आहे. देवरुख पोलिसांनी पाचही आरोपींविरुद्ध भारतीय न्यायसंहिता कलम ११७(२), १८९, १९०, १९१, ३५१ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

राज्यभरात तीन दिवसात २५० वीजचोरीची प्रकरणे उघड

६ कोटी २७ लाख रुपयांच्या वीजचोरीचा सुरक्षा व अंमलबजावणी विभागाकडून पर्दाफाश

ठाणे : महावितरणच्या सुरक्षा व अंमलबजावणी विभागाने राज्यात अवघ्या तिनच दिवसात राबविलेल्या वीज चोरी मोहीमेत वीज चोरी व अनधिकृत वीज वापराची २५० प्रकरणे उघडकीस आली आहेत. या कारवाईत ६ कोटी २७ लाख रुपयांच्या वीजचोरीचा पर्दाफाश करण्यात आला असून कारवाईमुळे वीज चोरांचे धाबे दणाणले आहे.

वीजचोरी आणि महसूल गळती रोखण्यासाठी भरारी पथकांच्या माध्यमातून विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. राज्यातील कोकण, पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर या प्रादेशिक परिक्षेत्रात सुरक्षा व अंमलबजावणी विभागाकडून तपासणी करण्यात आली. यामध्ये कोकण प्रादेशिक विभागात ५३, पुणे ७३, छत्रपती संभाजीनगर ५६ आणि नागपूर प्रादेशिक विभागात ६८ अशा एकूण २५० वीजचोरीची प्रकरणे उघडकीस आली. वीज चोरी प्रकरणांचे मुल्यांकन झाले असून ६ कोटी २७ लाख रूपयांच्या वीज चोरीचे बिल संबंधित ग्राहकांना देण्यात आले आहे. वीज चोरीचे देयक व दंडाचा भरणा न केल्यास गुन्हे दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या मोहिमेत २४० ग्राहकांविरुद्ध विद्युत कायदा २००३ च्या कलम १३५ अन्वये कारवाई करण्यात आली आहे. तर कलम १२६ नुसार अनधिकृत वीज वापर प्रकरणी दोघांविरुद्ध कारवाई करण्यात आली. वीजचोरीचे देयक व दंडाच्या रकमेचा विहित मुदतीत भरणा न करणाऱ्यांविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करण्यासाठी फिर्याद देण्यात येणार आहे. वीजचोरीच्या गुन्ह्यासाठी दंड व तीन वर्षांपर्यंत तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद आहे. सध्या थकबाकीमुळे वीजपुरवठा खंडित केलेल्या वीजजोडण्यांची तपासणी सुरू आहे. वीज ग्राहकांनी अधिकृत वीज जोडणी घेवूनच विजेचा वापर करण्याचे आवाहन महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र व सुरक्षा व अंमलबजावणी विभागाच्या कार्यकारी संचालक अपर्णा गिते यांनी केले आहे.

कंपनीच्या गोदामातून ९० हजारांची कंडक्टर वायर चोरीस

खेड : तालुक्यातील लवेल येथील लीना पॉवरटेक इंजिनिअर्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या मोकळ्या आवारातून अज्ञाताने तब्बल ९० हजार रुपये किमतीची कंडक्टर वायर लांबवल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी खेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अखिलेशकुमार श्रीलालताप्रसाद प्रजापती (वय ४८, रा. सध्या हनुमानपेठ, गांधीचौक, खेड; मूळ रा. विरार पूर्व, जि. पालघर) यांनी फिर्याद दिली आहे.

ही घटना २१ ऑक्टोबर रोजी सकाळी ९.३० ते २६ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८.३० या कालावधीत घडली. या प्रकरणी अज्ञातावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कार्तिकी यात्रेसाठी प्रतिपंढरपूर सज्ज

रत्नागिरी : कार्तिकी एकादशीसाठी येथील प्रतिपंढरपूर विठ्ठल मंदिर सज्ज झाले आहे. यानिमित्त उद्या (ता. २१) भागवत एकादशीला पहाटे विठ्ठल-रुक्मिणीची पूजा, अभिषेक करण्यात येणार आहे. त्यानंतर काकडे आरती व दिवसभर भजनांचा कार्यक्रम आयोजित केला आहे. मध्यरात्री विठुरायाची रथयात्रा काढण्यात येईल. तर २३ रोजी वैकुंठ चतुर्दशीला नगर प्रदक्षिणा काढण्यात येणार आहे. तसेच काकडा आरतीची सांगता २५ रोजी होणार असल्याची माहिती देवस्थानचे अध्यक्ष अशोक मयेकर यांनी दिली.

कार्तिकी एकादशीनिमित्त गेली अनेक वर्षे रत्नागिरीत मोठी यात्रा भरते. त्याकरिता बाहेरगावाहून अनेक विक्रेते दोन दिवसांपासून रत्नागिरीत दाखल झाले आहेत. त्यांनी आजपासूनच स्टॉल लावण्यास सुरवात केल्याने यात्रेचा माहोल तयार झाला असून बाजारात गर्दी पाहायला मिळाली. पोलिस प्रशासन व नगरपालिकेने यंदा यात्रेला शिस्त लावण्यासाठी नियोजन केले आहे.

प्रतिपंढरपूर म्हणून येथील विठ्ठल मंदिर सुप्रसिद्ध आहे. आषाढी यात्रेवेळी कोकणातील शेतकऱ्यांना पंढरपूरला विठुरायाच्या दर्शनाला जाणे शक्य नसल्याने येथे मंदिर उभारण्यात आले. पंढरपूरचे सर्व नित्योपचार या मंदिरात केले जातात. उद्या सकाळी ११ वाजता परटवणे येथील कै. दाजी नाचणकर, कै. अप्पा नाचणकर संस्थापित पायी दिंडी विठ्ठल मंदिरात पोहोचेल. दिवसभर भजनांनी मंदिराचा परिसर विठ्ठलमय होणार आहे. रात्री १२ वाजता विठुरायाच्या सजवलेल्या रथाची मिरवणूक बाजारपेठेतून ठरलेल्या मार्गावरून काढण्यात येणार आहे.

एकादशीनिमित्त भजने

सकाळी ७.३० श्री विठ्ठल रखुमाई काकडे, आरती भजन मंडळ, ८.३०- प्रविण सावंतदेसाई यांचे कीर्तन, ९.३०- श्री गणेश भजन मंडळ, पेठकिल्ला, १०.३०- श्री गगनगिरी भजन मंडळ, थिबा पॅलेस, ११.३०- श्री माऊली महिला भनजन मंडळ, दुपारी १२.३०- जय भवानी भजन मंडळ, टिळक आळी, २.०० श्री साईनाथ भजन मंडळ, ३- उत्कर्षा भजन मंडळ, भाटीमिऱ्या, ४- श्री गोवेकर बुवा भजन मंडळ, कुर्ली, ५- श्री कालभैरव भजन मंडळ, बसणी, ६- श्री महालक्ष्मी भजन मंडळ, ७- श्री विठ्ठल रखुमाई भजन मंडळ. १२ नंतर सवाद्य रथोत्सव मिरवणूक.

लाचखोरीचे आरोप असणाऱ्यांचा राज्यस्तरीय गौरव

आयएमएच्या पुरस्कार निवडीवर प्रश्नचिन्ह; आरोपांकडे दुर्लक्ष करून पुरस्कारांची खैरात?

रत्नागिरी : इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) महाराष्ट्र राज्याच्या वतीने डॉ. कांचन शिरीष मदार यांना सलग चौथ्यांदा राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले असले, तरी या निवडीवरून वैद्यकीय आणि सामाजिक वर्तुळात तीव्र भुवया उंचावल्या आहेत. ज्यांच्यावर लाच घेतल्याचे गंभीर आरोप आहेत, अशा व्यक्तीला थेट राज्यस्तरीय पातळीवर गौरविण्यात आल्याने आयएमएच्या पुरस्कार निवड प्रक्रियेच्या पारदर्शकतेवरच आता मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

नागपूर येथे १३ नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित आयएमए महाराष्ट्र राज्याच्या मॅस्टाकॉन २०२६ या वार्षिक परिषदेत हा सोहळा पार पडला. राज्याचे अध्यक्ष डॉ. संतोष कुलकर्णी यांच्या हस्ते, तर माजी अध्यक्ष डॉ. संतोष कदम



आणि नवनिर्वाचित अध्यक्षा डॉ. मंजुषा गिरी यांच्या उपस्थितीत डॉ. मदार यांना सन २०२५-२०२६ या वर्षासाठीचा प्रेसिडेंट ॲप्रिसिएशन अवॉर्ड - बेस्ट चेअरमन, वुमेन डॉक्टर्स विंग हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाराष्ट्रातील लाखो डॉक्टरांमधून कोकण विभागातील एकमेव महिला डॉक्टर म्हणून त्यांची निवड झाल्याचा डांगोरा पिटला जात असला, तरी त्यांच्यावरील आरोपांची पार्श्वभूमी पाहता हा गौरव कितपत योग्य आहे, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

डॉ. कांचन मदार या उच्चशिक्षित स्त्रीरोगतज्ज्ञ व मेडिकोलिगल सल्लागार असून, गेल्या वीस वर्षांपासून त्या या क्षेत्रात कार्यरत आहेत. यापूर्वीही त्यांना बेस्ट आयएमए डॉक्टर, सेवाभावी डॉक्टर आणि नवदुर्गा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. मात्र, एकीकडे लाचखोरीसारख्या गंभीर आरोपांचे सावट असताना आणि दुसरीकडे संघटनेकडून सलग चार वेळा राज्यस्तरीय पुरस्कारांची खैरात होत असल्याने, पुरस्कारांचे निकष नेमके काय आहेत, असा खोचक प्रश्न विचारला जात आहे.



दैनिक
कोकण किनारा
सर्वसामान्यांचा बुलंद आवाज...
रत्नागिरी व सिंधुदुर्ग स्वतंत्र आवृत्त्या

PRGI NO. MHMAR/26/A1026 | रत्नागिरी | वर्ष १ ले | अंक २५३ | शनिवार दि.२१ नोव्हेंबर २०२६ | पृष्ठे ८ | किंमत : ₹ ५

सलग नवव्या दिवशी सोने-चांदीत विक्रमी घसरण

एआय वादळाने जागतिक बाजार हादरला; सोने १.२९ तर चांदी १.५८ लाखावर

नवी दिल्ली : अमेरिकेतील एआय समभागांच्या कोसळण्याने जागतिक शेअर बाजारात मोठी खळबळ उडाली असून, त्याचा थेट परिणाम सराफा बाजारावरही झाला आहे. देशांतर्गत बाजारात सलग नवव्या दिवशी सोने ५,२०० रुपयांनी कोसळून १.२९ लाखांवर आले, तर चांदी ४,००० रुपयांनी घसरून १.५८ लाखांवर स्थिरावली.

जागतिक आर्थिक पटलावर गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेली अस्थिरता आता सर्वसामान्य गुंतवणूकदारांपासून ते लग्नसराईची तयारी करणाऱ्या कुटुंबांपर्यंत थेट भिडली आहे. अमेरिकन तंत्रज्ञान क्षेत्रातील एआय (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) समभागांचे भाव अवास्तव पातळीवर गेल्याच्या चिंतेतून गुंतवणूकदारांनी मोठ्या प्रमाणावर नफावसुली आणि विक्रीचा सपाटा लावला. या विक्रीच्या तडाख्याने वॉल स्ट्रीटसह आशियाई बाजारातही मोठी घसरण पाहायला मिळाली. जपानच्या निक्केईपासून दक्षिण कोरियाच्या कोस्पीपर्यंत आणि तैवानच्या शेअर बाजारापर्यंत सर्वत्र लाल रेषेचे साम्राज्य पसरले. आशियाई बाजार २०२० नंतरच्या सर्वात वाईट आठवड्याकडे वाटचाल करत



असल्याचे चित्र निर्माण झाले आहे, ज्यामुळे जागतिक गुंतवणूकदारांच्या विश्वासाला मोठा तडा गेला आहे.

या जागतिक भूकंपाचे हादरे भारतीय सराफा बाजारातही तीव्रतेने जाणवले. शुक्रवारी देशांतर्गत बाजारात ९९.९ टक्के शुद्धतेचे सोने प्रति दहा ग्रॅम ५,२०० रुपयांनी घसरून १,२९,३०० रुपयांवर आले; आदल्या सत्रात ते १,३४,५०० रुपयांवर बंद झाले होते. चांदीनेही घसरणीची हीच वाट धरत प्रति किलो ४,००० रुपयांची गळती अनुभवली आणि ती १,५८,००० रुपयांवर पोहोचली. आंतरराष्ट्रीय बाजारातही स्पॉट गोल्ड ३,५८६ डॉलर प्रति औंसच्या आसपास घसरले, तर चांदीही ४२.६२ डॉलर प्रति औंसवर आली. सोने आणि चांदी या दोन्ही मौल्यवान धातूंनी सप्टेंबर २०२५ नंतरचा नीचांकी स्तर गाठल्याने बाजारात कमालीची अस्वस्थता पसरली आहे.

सोने आणि चांदीच्या या घसरणीकडे पाहताना गेल्या काही महिन्यांतील प्रवासाचा आढावा घेणे महत्त्वाचे ठरते. वर्षाच्या सुरुवातीला, विशेषतः जानेवारी २०२६ च्या सुमारास सोन्याने तब्बल १.८० लाख रुपये प्रति दहा ग्रॅमचा विक्रमी उच्चांक गाठला होता. त्यानंतर ऑक्टोबर आणि नोव्हेंबरमध्ये दबाव वाढत गेला. ऑक्टोबरमध्येच आंतरराष्ट्रीय पातळीवर सोन्याने सलग दुसऱ्या महिन्याची घसरण नोंदवली होती आणि देशांतर्गत दरातही घट झाली होती. नोव्हेंबरच्या सुरुवातीपासून सुरू झालेली ही घसरण गेल्या महिन्याभरात अधिकच तीव्र झाली असून, जानेवारीच्या उच्चांकावरून सोने तब्बल ३० टक्क्यांहून अधिक कोसळले आहे. डॉलरची मजबुती, अमेरिकन फेडरल रिझर्व्हकडून संभाव्य व्याजदरवाढीची शक्यता आणि गुंतवणूकदारांचा रोखे बाजाराकडे वळलेला कल यामागे प्रमुख कारणे मानली जात आहेत.

हा विषय सर्वसामान्यांसाठी अत्यंत जिव्हाळ्याचा ठरला आहे, कारण भारतात सोने-चांदी म्हणजे केवळ गुंतवणुकीचे साधन नसून कुटुंबाची सुरक्षितता, परंपरा आणि सण-समारंभाचा अविभाज्य भाग आहे. सध्या लग्नसराईचा हंगाम सुरू असताना दरात झालेली मोठी घट दागिने खरेदी करणाऱ्या मध्यमवर्गीय आणि सामान्य कुटुंबांसाठी मोठा दिलासा मानली जात आहे. ज्या कुटुंबांना आगामी काळात लग्नासाठी दागिने घ्यायचे आहेत, त्यांच्यासाठी सध्याचे दर काहीसा श्वास घेण्याचा अवकाश देणारे ठरत आहेत. मात्र, ज्यांनी उच्चांकी दराच्या आसपास किंवा गेल्या काही महिन्यांत मोठी गुंतवणूक केली आहे, त्यांच्या पोर्टफोलिओचे मूल्य तात्पुरते घटल्याने चिंतेचे वातावरण आहे. सलग नऊ दिवसांच्या घसरणीनंतर बाजारात आणखी खाली जाणार की इथून उसळी येणार यावरून जोरदार चर्चा सुरू आहे. तांत्रिक विश्लेषकांच्या मते, विक्रीचा जोर इतका तीव्र आहे की बाजार ओव्हरसोल्ड झोनमध्ये गेला आहे. अशा स्थितीत अचानक तांत्रिक सुधारणा किंवा उसळी येण्याची शक्यता नाकारता येत नाही, तसेच चढ-उताराचे सत्र सुरू राहू शकते. एकीकडे जागतिक शेअर बाजारातील एआय समभागांची पडझड आणि दुसरीकडे सोने-चांदीतील ऐतिहासिक घसरण यामुळे गुंतवणूकदारांसमोर थांबायचे की खरेदी करायची हा मोठा पेच उभा राहिला आहे.

दुष्काळ निवारणासाठी राज्याचा 'मास्टरप्लॅन'

कायमस्वरूपी पाणीटंचाई निवारण आराखडा तयार करण्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे प्रशासनाला निर्देश

मुंबई : राज्यातील गंभीर दुष्काळजन्य परिस्थितीवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी ऑगस्ट २०२७ पर्यंत सर्वंकष पाणीटंचाई निवारण आराखडा तयार करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी नांदेड येथे झालेल्या बैठकीत प्रशासनाला दिले आहेत. यासोबतच बारामती विमानतळ विकासासाठी १३२ कोटी रुपये आणि पवना धरणग्रस्तांना पर्यायी जमीन देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णयही बैठकीत घेण्यात आला.

राज्याच्या विविध भागांत वारंवार उद्भवणाऱ्या दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी तात्पुरत्या उपाययोजनांऐवजी दीर्घकालीन नियोजनावर भर देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या पार्श्वभूमीवर मंत्रालयात उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार



यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीत पाणीटंचाईग्रस्त जिल्ह्यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. भविष्यातील संभाव्य पाणीटंचाई टाळण्यासाठी आणि शेतीसह पिण्याच्या पाण्याचे नियोजन अचूक करण्यासाठी ऑगस्ट २०२७ पर्यंत राज्याचा विशेष मास्टरप्लॅन तयार करण्याचे स्पष्ट आदेश उपमुख्यमंत्र्यांनी संबंधित विभागांना दिले आहेत.

या आराखड्यांतर्गत भूजल पातळी वाढवणे, जलयुक्त शिवार यांसारख्या जलसंधारण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे, पाझर तलाव आणि बंधाऱ्यांची दुरुस्ती करणे तसेच सिंचन प्रकल्पांची अपूर्ण कामे प्राधान्याने पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. टँकरमुक्त महाराष्ट्र घडवण्यासाठी प्रत्येक तालुक्याचा स्वतंत्र जलस्रोत आराखडा तयार करावा, जेणेकरून पावसाचे पाणी जास्तीत जास्त अडवून ते जमिनीत मुरवता येईल, अशी सूचना त्यांनी केली. दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी पीक पद्धतीत बदल करणे आणि सूक्ष्म सिंचनाला प्रोत्साहन देणे या बाबींचाही या मास्टरप्लॅनमध्ये समावेश असणार आहे. प्रशासकीय यंत्रणांनी समन्वयाने काम करून या आराखड्याची अंमलबजावणी कालबद्ध पद्धतीने करावी, जेणेकरून पुढील काही वर्षांत दुष्काळाची तीव्रता कमी करता येईल, असेही पवार यांनी स्पष्ट केले.

पाणीटंचाई निवारणाच्या या व्यापक आराखड्यासोबतच राज्यातील पायाभूत सुविधा आणि प्रलंबित पुनर्वसन प्रश्नांवरही या बैठकीत मोठे निर्णय घेण्यात आले. पुणे जिल्ह्यातील बारामती विमानतळाच्या सर्वांगीण विकासासाठी १३२ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी देण्यात आली आहे. या निधीतून विमानतळाच्या धावपट्टीचे विस्तारीकरण, आधुनिक नाईट लँडिंग सुविधा, टर्मिनल इमारतीचे नूतनीकरण आणि प्रवाशांसाठी आवश्यक सोयीसुविधा उभारल्या जाणार आहेत. या प्रकल्पामुळे पश्चिम महाराष्ट्रातील औद्योगिक, कृषी आणि व्यापारी विकासाला मोठी चालना मिळणार असून, उत्पादित माल थेट देश-विदेशातील बाजारपेठेत पाठवणे अधिक सुलभ होणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पवना धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रश्नही या बैठकीत मार्गी लावण्यात आला. प्रकल्पासाठी जमिनी दिलेल्या बाधित शेतकऱ्यांना आणि कुटुंबांना हक्काची पर्यायी जमीन देण्याचा ऐतिहासिक निर्णय शासनाने घेतला आहे. या निर्णयामुळे अनेक दशकांपासून न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या धरणग्रस्त कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला असून, जमीन वाटपाची प्रक्रिया तातडीने आणि पारदर्शकपणे पूर्ण करण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाला देण्यात आले आहेत.

सुविचार : नेहमी स्वतःचे चारित्र्य शुद्ध ठेवा.

दिनविशेष

जागतिक दूरदर्शन दिन : माहिती, शिक्षण आणि मनोरंजनाचे प्रभावी माध्यम म्हणून दूरदर्शनचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी १९९६ पासून हा दिवस घोषित केला आहे.

जागतिक मत्स्यव्यवसाय दिन : शाश्वत मत्स्यपालनाला प्रोत्साहन देणे आणि सागरी व गोड्या पाण्यातील परिसंस्थांचे रक्षण करणे या उद्देशाने हा दिवस साजरा केला जातो.

१९६२ : यशवंतराव चव्हाण यांची भारताचे संरक्षण मंत्री म्हणून नियुक्ती झाली.

१९६२ : भारत-चीन युद्धादरम्यान चीनने जाहीर केलेली एकतर्फी युद्धबंदी अमलात आली.

जन्मदिन

व्हॉल्तेर (१६९४) : फ्रेंच प्रबोधन काळातील प्रसिद्ध तत्त्वज्ञानी, इतिहासकार आणि लेखणीतून अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे विचारवंत.

सम्राज्ञी व्हिक्टोरिया (१८४०) : युनायटेड किंगडमच्या राणी व्हिक्टोरिया आणि जर्मन सम्राज्ञी.

हरेकृष्णा महाताब (१८९९) : भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील नेते आणि ओडिशा राज्याचे पहिले मुख्यमंत्री.

प्रेम नाथ (१९२६) : हिंदी चित्रपटसृष्टीतील सुप्रसिद्ध अभिनेते.

पंचांग

दिनांक	: २१ नोव्हेंबर २०२६
वार	: शनिवार
मराठी महिना	: कार्तिक
पक्ष	: शुक्ल पक्ष
तिथी	: द्वादशी
सूर्योदय	: सकाळी ०६:४९ वा.
सूर्यास्त	: संध्याकाळी ०५:५९ वा.
चंद्रोदय	: दुपारी ०३:१५ वा.
चंद्रास्त	: रात्री ०३:१४ वा.

राशीभविष्य

मेष : प्रामाणिक प्रयत्नांना यश मिळेल आणि कामाच्या ठिकाणी रखडलेली कामे मार्गी लागतील.

वृषभ : कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढतील, पण सरकारी कामातील अडथळे दूर होऊन व्यापारात लाभ होईल.

मिथुन : आरोग्यात सुधारणा होईल आणि आर्थिक उत्पन्नाचे नवीन मार्ग खुले होतील.

कर्क : नशिबाची उत्तम साथ मिळेल आणि समाजात मान-सन्मान वाढेल.

सिंह : व्यावसायिक प्रवास फायदेशीर ठरतील आणि घरात एखादे शुभ कार्य घडण्याची शक्यता आहे.

कन्या : इतरांच्या वादात मध्यस्थी करणे टाळा.

तूळ : भागीदारीतील व्यवसायात चांगल्या संधी मिळतील आणि वैवाहिक जीवनात आनंदाचे वातावरण राहील.

वृश्चिक : मालमत्ता खरेदीसाठी दिवस अनुकूल आहे, मात्र नोकरीच्या ठिकाणी थोडे सावध राहणे गरजेचे आहे.

धनु : रखडलेली कामे पूर्ण होतील.

मकर : आत्मविश्वास वाढेल व नवीन जबाबदाऱ्या मिळतील.

कुंभ : विरोधकांवर तुमचा प्रभाव राहील आणि सामाजिक कार्यात सहभाग वाढेल; खर्चावर नियंत्रण ठेवा.

मीन : नियमित दिनचर्या व आरोग्याची काळजी घ्या.

जागतिक दूरदर्शन दिन

दरवर्षी २१ नोव्हेंबर हा दिवस संपूर्ण जगात 'जागतिक दूरदर्शन दिन' म्हणून मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रसंघाने सन १९९६ मध्ये पहिल्या जागतिक दूरदर्शन मंचाचे आयोजन केले होते आणि त्याच दिवसाच्या स्मरणार्थ या दिनाची घोषणा करण्यात आली. दूरदर्शन हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून ते माहिती, शिक्षण, प्रबोधन आणि जागतिक संवादाचे एक अत्यंत प्रभावी माध्यम आहे. मानवी जीवनात या अद्भुत शोधाने मोठी क्रांती घडवून आणली आहे. पूर्वीच्या काळी जगाच्या एका कोपऱ्यात घडलेली घटना दुसऱ्या कोपऱ्यात समजण्यासाठी अनेक दिवस लागायचे, परंतु दूरदर्शनच्या आगमनाने संपूर्ण जग एका छोट्या पडद्यावर येऊन ठेपले आहे. सुरुवातीच्या काळात कृष्णधवल स्वरूपात असणारे हे माध्यम काळाच्या ओघात रंगीत आणि अधिक सुस्पष्ट झाले. भारतात १५ सप्टेंबर १९५९ रोजी दूरदर्शनची सुरुवात झाली आणि बघता बघता ते प्रत्येक घराचा एक अविभाज्य भाग बनले. पूर्वीच्या काळी संपूर्ण कुटुंब आणि शेजारीपाजारी एकत्र बसून दूरदर्शनवरील विविध मालिका, चित्रपट, संगीत कार्यक्रम आणि बातम्या पाहत असत, ज्यामुळे समाजात एकोपा आणि आपुलकीची भावना वाढीस लागली. आजही खेड्यापाड्यांत आणि शहरांत शेतीविषयक मार्गदर्शन, हवामानाचा अचूक अंदाज, आरोग्यविषयक जनजागृती आणि शालेय शिक्षणाचे धडे देण्यासाठी दूरदर्शनचा मोठा वापर केला जातो. क्रीडा स्पर्धांचे थेट प्रक्षेपण असो वा देशातील महत्त्वाच्या राजकीय व सामाजिक घडामोडी असोत, दूरदर्शन आपल्याला घरबसल्या सर्व घडामोडींचा प्रत्यक्ष अनुभव देते. सध्याच्या आधुनिक काळात भ्रमणध्वनी आणि अंतरजालाचा वापर प्रचंड वेगाने वाढला असला, तरीही दूरदर्शनचे स्वतःचे असे एक वेगळे स्थान आणि विश्वासार्हता आजही टिकून आहे. अनेकदा समाजमाध्यमांवर पसरणाऱ्या चुकीच्या माहितीच्या काळात, अधिकृत आणि खात्रीशीर बातम्यांसाठी सर्वसामान्य नागरिक आजही दूरदर्शनकडेच आशेने पाहतात. या माध्यमाचा प्रभाव थेट लोकांच्या मनावर आणि विचारांवर पडतो, त्यामुळे लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून याची जबाबदारी अत्यंत मोठी आहे. समाजात शांतता, बंधुता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सकारात्मक विचार रुजवण्याचे काम या माध्यमातून प्रभावीपणे होऊ शकते. केवळ स्पर्धेच्या नादात भडक किंवा दिशाभूल करणारी माहिती दाखवण्याऐवजी, सत्य आणि समाजोपयोगी विषय मांडणे ही काळाची खरी गरज आहे. तसेच, प्रेक्षकांनीही दूरदर्शनचा वापर मर्यादित आणि योग्य पद्धतीने करणे आवश्यक आहे, जेणेकरून लहान मुलांच्या अभ्यासावर आणि आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होणार नाही. ज्ञानाची कवाडे उघडणारे आणि विविध संस्कृतींना एकत्र जोडणारे हे माध्यम मानवी प्रगतीचा खरा आरसा आहे.

सौंदर्य टीप्स

पपई आणि मधाचा लेप

नैसर्गिक आणि चमकदार त्वचा मिळवण्यासाठी बाजारातील महागड्या रासायनिक उत्पादनांपेक्षा घरगुती उपाय नेहमीच अधिक सुरक्षित आणि प्रभावी ठरतात, आणि त्यामध्ये पपई व मधाचा वापर हा अत्यंत गुणकारी मानला जातो. पिकलेल्या पपईमध्ये जीवनसत्त्व अ, क आणि ई तसेच त्वचेसाठी उपयुक्त नैसर्गिक घटक मुबलक प्रमाणात असतात. दुसरीकडे, शुद्ध मध हे एक उत्तम नैसर्गिक आर्द्रता देणारे घटक असून त्यामध्ये जिवाणूविरोधी गुणधर्म असतात, ज्यामुळे त्वचेतील ओलावा टिकून राहतो आणि मुरूम किंवा पुटकुळ्यांसारख्या समस्या दूर होण्यास मदत होते. पपई आणि मधाचा हा घरगुती लेप तयार करणे अत्यंत सोपे आहे; यासाठी पिकलेल्या पपईचे तीन ते चार मोठे तुकडे घेऊन ते वाटीमध्ये चांगले कुस्करून त्याचा एकदम मऊ लगदा तयार करून घ्यावा. या लगद्यामध्ये एक चमचा शुद्ध मध घालून दोन्ही घटक चांगले मिसळावेत. हा लेप लावण्यापूर्वी चेहरा आणि मान कोमट पाण्याने स्वच्छ धुवून मऊ सुती कापडाने टिपून घ्यावी, जेणेकरून त्वचेवरील धूळ आणि अतिरिक्त तेल निघून जाईल. त्यानंतर तयार केलेला पपई आणि मधाचा लेप बोटांच्या साहाय्याने संपूर्ण चेहऱ्यावर आणि मानेवर एकसमान लावून घ्यावा आणि डोळ्यांच्या नाजूक भागापासून तो दूर ठेवावा. हा लेप चेहऱ्यावर साधारण पंधरा ते वीस मिनिटे सुकू द्यावा आणि त्यानंतर थंड किंवा साध्या पाण्याने चेहरा स्वच्छ धुवून टाकावा. जर तुमची त्वचा खूप कोरडी असेल, तर या मिश्रणामध्ये थोडे कच्चे दूध किंवा दुधाची ताजी साय मिसळल्यास त्वचा अधिक मऊ आणि तजेलदार होते. याउलट, तेलकट त्वचा असलेल्या व्यक्तींनी या लेपामध्ये चिमूटभर चंदन भुकटी किंवा लिंबाच्या रसाचे दोन-तीन थेंब घातल्यास चेहऱ्यावरील अतिरिक्त तेलकटपणा कमी होऊन मुरुमांचे डाग फिके पडतात. आठवड्यातून किमान दोन वेळा हा उपाय नियमितपणे केल्यास उन्हामुळे आलेला काळवंडलेपणा, काळे डाग आणि चेहऱ्यावरील थकवा हळूहळू नाहीसा होतो. पपईतील पोषक घटकांमुळे त्वचेचा सैलपणा कमी होऊन अकाली येणाऱ्या सुरकुत्या रोखण्यास मदत होते आणि चेहरा तरुण व टवटवीत दिसतो. संवेदनशील त्वचा असलेल्यांनी हा लेप चेहऱ्यावर लावण्यापूर्वी हाताच्या त्वचेवर थोडासा लावून तपासणी करून घ्यावी. कोणतेही दुष्परिणाम न होता घरच्या घरीच कमी खर्चात मऊ, निरोगी आणि नैसर्गिकरीत्या तेजस्वी त्वचा मिळवण्यासाठी पपई आणि मधाचा हा सोपा उपाय खरोखरच एखाद्या वरदानासारखा अत्यंत उपयुक्त आणि परिणामकारक ठरतो.

बोधकथा

वादळातही अखंड तेवणारी ज्योत



सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या एका शांत डोंगराळ गावात राघव नावाचे एक वृद्ध कंदील बनवणारे कारागीर राहत होते. त्यांनी बनवलेले कंदील संपूर्ण पंचक्रोशीत प्रसिद्ध होते, कारण सोसाट्याच्या वाऱ्यातही त्यांची ज्योत कधीच विझत नसे. राघव यांच्याकडे समर आणि रोहन नावाचे दोन तरुण ही कला शिकण्यासाठी येत असत. समर अत्यंत चपळ आणि हुशार होता, पण त्याला नेहमीच कामात घाई करण्याची सवय होती. तो दिवसातून दहा-बारा कंदील सहज तयार करायचा आणि ते स्वस्तात विकून भरपूर पैसे कमावण्याची स्वप्ने पाहायचा. दुसरीकडे, रोहन खूप शांत आणि संयमी होता. तो दिवसातून जेमतेम दोनच कंदील बनवायचा, कारण तो प्रत्येक कंदिलाच्या काचेची जाडी, वातीची रचना आणि हवा खेळती राहण्यासाठी असलेली बारीक छिद्रे अत्यंत काळजीपूर्वक तपासून पाहायचा. समर नेहमी रोहनची थट्टा करायचा आणि म्हणायचा की, तू असाच संथ काम करत राहिलास तर आयुष्यात कधीच श्रीमंत होणार नाहीस. रोहन मात्र हसून गप्प बसायचा आणि आपल्या कामातील अचूकतेवर लक्ष केंद्रित करायचा. काही महिन्यांनी राघव यांनी दोघांची परीक्षा घेण्यासाठी गावातील जत्रेत त्यांचे कंदील विक्रीला ठेवले. समरचे कंदील दिसायला चकचकीत आणि स्वस्त असल्यामुळे लोकांनी ते लगेच विकत घेतले, तर रोहनचे कंदील महाग वाटल्यामुळे मोजक्याच लोकांनी घेतले. समरला आपल्या यशाचा खूप गर्व झाला आणि त्याने रोहनकडे तुच्छतेने पाहिले. मात्र, काही दिवसांतच त्या भागात एक भयंकर वादळ आले आणि मुसळधार पाऊस सुरू झाला. संपूर्ण गावात अंधार पसरला आणि गावाबाहेरच्या नदीकाठी एक कुटुंब पुराच्या पाण्यात अडकल्याची बातमी आली. गावकऱ्यांनी त्यांना वाचवण्यासाठी आपापले कंदील पेटवले आणि ते नदीकाठाकडे निघाले. पण जसा सोसाट्याचा वारा सुटला, तसे समरने बनवलेले बहुतांश कंदील फडफडून विझून गेले. काही कंदिलांच्या काचा उष्णतेमुळे तडकल्या, कारण समरने घाईत हवा जाण्याची छिद्रे नीट बनवली नव्हती. त्या भयाण अंधारात केवळ रोहनने बनवलेले ते मोजकेच कंदील अखंड आणि स्थिरपणे जळत होते. त्याच कंदिलांच्या प्रकाशात गावकऱ्यांनी अडकलेल्या कुटुंबाला सुखरूप बाहेर काढले आणि त्यांचे प्राण वाचवले. समरला स्वतःच्या घाईचा आणि गर्वाचा खूप पश्चात्ताप झाला. त्याने रोहनची माफी मागितली आणि त्या दिवसापासून कामाच्या वेगापेक्षा त्याच्या गुणवत्तेला महत्त्व देण्याचा निश्चय केला.

कथेचा बोध

कामातील घाईपेक्षा अचूकता, संयम आणि प्रामाणिकपणा नेहमीच श्रेष्ठ ठरतो; कारण खऱ्या गुणवत्तेची खरी परीक्षा कठीण प्रसंगीच होते.

मैदानातून मार्गदर्शकाकडे, धोनीचे सुवर्णयुग कायम

भारतीय क्रिकेटच्या इतिहासात कॅप्टन कूल म्हणून ओळखला जाणारा महेंद्रसिंग धोनी आज आयपीएलच्या मैदानातूनही निवृत्त होऊन चेन्नई सुपर किंग्जच्या मार्गदर्शकाच्या भूमिकेत उतरला आहे, ही केवळ एका खेळाडूच्या प्रवासाची सांगता नसून भारतीय क्रिकेटच्या एका सुवर्णयुगाचा कळस आहे. रांचीसारख्या छोट्या शहरातून आलेल्या एका सर्वसामान्य तरुणाने आपल्या जिद्दीच्या, संयमाच्या आणि अफाट नेतृत्वाच्या जोरावर जागतिक क्रिकेटच्या नकाशावर भारताचे नाव सुवर्णाक्षरांनी कोरले, ही बाब प्रत्येक भारतीयासाठी अभिमानास्पद आहे. त्याने आता सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून निवृत्ती स्वीकारली असून त्याच्या नावाशी घट्ट जोडलेली सात क्रमांकाची जर्सीही आता कायमची निवृत्त झाली आहे, हा निर्णय त्याच्या अद्वितीय योगदानाला दिलेली सर्वोच्च आदरांजली आहे. धोनीची कारकीर्द म्हणजे केवळ आकडेवारीचा खेळ नव्हता, तर ती एक विचारधारा होती; दबावाच्या क्षणांतही मन शांत ठेवण्याची, संकटातही विजयाचा मार्ग शोधण्याची आणि संघाला कुटुंबासारखे बांधून ठेवण्याची ती एक अजोड कला होती. २००४ मध्ये बांगलादेशविरुद्ध आंतरराष्ट्रीय पदार्पण करताना ज्या खेळाडूच्या सुरुवातीच्या काही सामन्यांत फारशी चमक दिसली नव्हती, त्याच खेळाडूने पुढे जाऊन कर्णधारपदाची धुरा सांभाळली आणि भारतीय क्रिकेटची दिशाच बदलून टाकली. २००७ च्या टी-२० विश्वचषकातील ऐतिहासिक विजय असो, २०११ च्या एकदिवसीय विश्वचषकातील वानखेडेच्या मैदानावरील तो अविस्मरणीय षटकार असो किंवा २०१३ ची चॅम्पियन्स ट्रॉफी असो, आयसीसीच्या तिन्ही प्रमुख स्पर्धा जिंकणारा धोनी हा जगातील एकमेव कर्णधार ठरला, ज्यामुळे भारतीय क्रिकेटला अजिंक्यता आणि आत्मविश्वासाची नवी झळाळी मिळाली. कसोटी क्रिकेटमध्ये भारताला पहिल्यांदाच क्रमांक एकचे स्थान मिळवून देण्यात धोनीचा सिंहाचा वाटा राहिला, तर मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये त्याने फिनिशर या भूमिकेला नवा आयाम दिला. शेवटच्या चेंडूपर्यंत सामना खेचून नेणे आणि प्रतिस्पर्ध्याच्या मनात विजयाची खात्री असतानाही सामना हिसकावून घेणे, हे धोनीचे वैशिष्ट्य जगभरातील चाहत्यांच्या स्मरणात कायम राहील. यष्टिरक्षणातील त्याची चपळता, विजेच्या वेगाने होणारी स्टंपिंग आणि क्षेत्ररक्षणाची अचूक रचना यामुळे अनेक अशक्य वाटणारे सामने भारताने जिंकले. आयपीएलमध्ये चेन्नई सुपर किंग्जला त्याने केवळ विजेतेपद मिळवून दिले नाही, तर चेन्नई आणि धोनी हे एक अतूट नाते बनले; पिवळ्या जर्सीतील त्याचे वावरणे आणि चेपॉकच्या मैदानावरील चाहत्यांचा जल्लोष भारतीय क्रीडा संस्कृतीचा अविभाज्य भाग बनला होता. नव्या खेळाडूंना हेरून त्यांना घडवण्याची त्याची दृष्टी वाखाणण्याजोगी होती; अनेक युवा खेळाडूंनी त्याच्या छत्रछायेखाली आपले करिअर घडवले आणि भारताच्या मुख्य संघात स्थान मिळवले. धोनीच्या नेतृत्वाचे सर्वात मोठे यश म्हणजे त्याने कधीही यशाचा उन्माद होऊ दिला नाही आणि अपयशाने खचून न जाता प्रत्येक पराभवाची जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घेतली. मैदानाबाहेरही त्याने आपले खाजगी आयुष्य मर्यादित आणि निवांत ठेवून प्रसिद्धीच्या झोतापासून स्वतःला दूर ठेवले, ज्यामुळे त्याच्या व्यक्तिमत्त्वाला अधिकच खोली प्राप्त झाली. आज जेव्हा तो खेळाडू म्हणून मैदानातून दूर जाऊन चेन्नई सुपर किंग्जचा मार्गदर्शक म्हणून नवी जबाबदारी स्वीकारत आहे, तेव्हा त्याचे अनुभव, रणनीती आणि शांत स्वभाव आगामी पिढीसाठी अत्यंत मोलाचा ठरेल. सात क्रमांकाची जर्सी निवृत्त होणे म्हणजे एका युगाचा पडदा पडणे असले, तरी धोनीने पेरलेले संस्कार आणि त्याने दिलेला विजयाचा आत्मविश्वास भारतीय क्रिकेटमध्ये सदैव जिवंत राहील. कठीण प्रसंगी डगमगून न जाता ध्येयावर लक्ष केंद्रित कसे करावे, याचा वस्तुपाठ धोनीने आपल्या संपूर्ण कारकीर्दीतून घालून दिला आहे. क्रिकेटच्या पलीकडे जाऊन तो एक आदर्श नेतृत्व, संयम आणि समर्पणाचे प्रतीक बनला आहे. त्याच्या निवृत्तीने एक पोकळी नक्कीच निर्माण झाली आहे, परंतु मार्गदर्शकाच्या रूपात तो पुन्हा एकदा संघाला योग्य दिशा देईल, याची खात्री चाहत्यांना आहे. भारतीय क्रिकेटच्या इतिहासात महेंद्रसिंग धोनीचे स्थान अढळ राहील आणि त्याच्या कर्तृत्वाची गाथा पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील. लहानपणी रेल्वे तिकीट तपासनीसाची नोकरी करतानाही ज्या मनात क्रिकेटची आग धगधगत होती, त्या आगीने पुढे लाखो तरुणांना स्वप्न पाहण्याची आणि ती पूर्ण करण्याची हिंमत दिली. अनेकदा अपयश आणि टीकेचे प्रसंग आले, परंतु धोनीने कधीही संतापाचा पारा चढू दिला नाही किंवा वादात अडकून आपली ऊर्जा वाया घालवली नाही. ज्या क्षणी संपूर्ण देश विजयाची आशा सोडून देतो, त्याच क्षणी हा खेळाडू शांतपणे क्रीझवर उभा राहून डावाची बांधणी करायचा आणि अखेरीस विजयाचा शिक्कामोर्तब करायचा. त्याच्या या शांत वृत्तीमुळेच कर्णधारपद ही केवळ जबाबदारी न राहता एक कला बनली. विविध शहरांतील चाहत्यांनी केवळ धोनीसाठी मैदानावर गर्दी केली, कारण त्याच्या खेळात अनपेक्षिततेचा थरार आणि जिंकण्याची अदम्य इच्छाशक्ती होती. आज जेव्हा तो मार्गदर्शकाच्या नव्या भूमिकेतून संघाला घडवणार आहे, तेव्हा त्याच्या अनुभवाचा फायदा नवीन खेळाडूंना नक्कीच होईल आणि भारतीय क्रिकेटचा हा अमूल्य वारसा पुढील अनेक दशके समाजाला मार्ग दाखवत राहील. साधारण कुटुंबातून पुढे येऊन कष्ट, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या बळावर शिखर कसे गाठता येते, याचे जिवंत उदाहरण धोनीने समाजासमोर ठेवले आहे. खेळाडूंच्या मानसिकतेत बदल घडवून आणणारा आणि मैदानातील प्रत्येक निर्णयामागे दूरदृष्टी असणारा हा नेता भारतीय क्रीडा विश्वात नेहमीच वेगळा ठरला आहे. त्याच्या मार्गदर्शनाखाली युवा खेळाडू केवळ तंत्रच नव्हे, तर मानसिक कणखरपणाही शिकतील आणि नव्या आत्मविश्वासाने मैदानात उतरतील, अशी अपेक्षा प्रत्येक क्रीडाप्रेमीला आहे. धोनीचे योगदान केवळ विजयापुरते मर्यादित नसून त्याने भारतीय क्रिकेटला दिलेली शिस्त, एकजूट आणि जिंकण्याची सवय हीच त्याची खरी श्रीमंती आहे.

निरूपण



पाहतां तुझेनि पाडें ।
दिसे त्रैलोक्यही थोकडें ।
ऐसें पुरुषत्व चोखडें ।
पार्था तुझें ।। ११ ।।

पाहतां तुझेनि पाडें ।
दिसे त्रैलोक्यही थोकडें ।

हे अर्जुना, तुझ्या सामर्थ्याची आणि पराक्रमाची तुलना केली, तर हे संपूर्ण त्रैलोक्य देखील तुझ्यापुढे खूप लहान वाटते. स्वर्ग, मृत्यू आणि पाताळ या तिन्ही लोकांतील कोणीही तुझ्या पराक्रमाची बरोबरी करू शकत नाही.

ऐसें पुरुषत्व चोखडें ।
पार्था तुझ ।।

हे पार्था, तुझे शौर्य आणि तुझा पुरुषार्थ इतका शुद्ध, श्रेष्ठ आणि तेजस्वी आहे. तुझ्या अंगी असलेले हे अफाट बळ संपूर्ण जगात अद्वितीय आहे.

भावार्थ:

रणांगणावर नातेवाईकांना पाहून अर्जुन खचून गेला आहे आणि रडू लागला आहे.अशा वेळी श्रीकृष्ण त्याला सावरण्यासाठी त्याच्या गतकाळातील पराक्रमाची जाणीव करून देतात. श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतात की, तू यापूर्वी प्रत्यक्ष भगवान महादेवाशी युद्ध करून त्यांना प्रसन्न केले आहेस.तसेच बलाढ्य निवातकवच राक्षस आणि गंधर्वांचाही तू युद्धात पराभव केला आहेस. तुझ्या या अफाट पराक्रमाची आणि सामर्थ्याची बरोबरी कोणीही करू शकत नाही.तुझ्या शौर्यापुढे तर स्वर्ग, मृत्यू आणि पाताळ हे तिन्ही लोकही अत्यंत लहान आणि फिके पडतात.हे पार्था, तुझा पुरुषार्थ आणि तुझे तेज इतके शुद्ध आणि श्रेष्ठ आहे.संकटसमयी स्वतःचे सामर्थ्य विसरून न जाता तू धैर्याने उभे राहिले पाहिजे, असा उपदेश श्रीकृष्ण करतात.

व्यक्तिविशेष



शंकर नारायण नवरे

मराठी साहित्यविश्वात आपल्या संवेदनशील, प्रवाही आणि मध्यमवर्गीय जीवनाचा अचूक वेध घेणाऱ्या लेखणीने अढळ स्थान निर्माण करणारे ज्येष्ठ साहित्यिक, नाटककार आणि पटकथालेखक म्हणजे शंकर नारायण नवरे, ज्यांना रसिक वाचक प्रेमाने शं. ना. नवरे म्हणून ओळखतात. त्यांचा जन्म २१ नोव्हेंबर १९२७ रोजी झाला. मुंबई म हानगरपालिकेत अनेक वर्षे नोकरी करत असतानाच त्यांनी आपली साहित्यसेवा अखंडपणे सुरू ठेवली आणि मराठी साहित्याला एकाहून एक सरस कलाकृती दिल्या. शं. ना. नवरे यांच्या लेखनाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी सामान्य माणसाच्या आयुष्यातील बारीकसारीक प्रसंग, कौटुंबिक नातेसंबंधांमधील गुंतागुंत, पती-पत्नीमधील अबोल प्रेम, तरुण पिढीची स्वप्ने आणि ज्येष्ठांच्या व्यथा अत्यंत हळुवारपणे व वास्तववादी शैलीत मांडल्या. त्यांच्या साहित्यात कधीही भडकपणा किंवा कृत्रिमता जाणवली नाही, तर प्रत्येक वाचकाला ती कथा स्वतःच्याच घरातील किंवा ओळखीची वाटायची. कथा, कादंबरी, नाटक, ललित लेखन आणि चित्रपट पटकथा अशा सर्वच साहित्यप्रकारांत त्यांनी लीलया मुशाफिरी केली. कस्तुरी, शहाणी सकाळ, पैठणी, झोपाळा, मनातले चांदणे, बिलोरी, इंद्रायणी आणि तिला काही सांगायचंय यांसारखे त्यांचे अनेक कथासंग्रह प्रचंड गाजले. कथाकथनाच्या कार्यक्रमांतूनही त्यांनी महाराष्ट्रभरातील रसिकांना मंत्रमुग्ध केले. रंगभूमीवरही त्यांनी आपला स्वतंत्र ठसा उमटवला. सूर राहू दे, धुम्मस, गहिरे रंग, गुंतता हृदय हे, वर्षाव आणि हसत खेळत या त्यांच्या नाटकांनी मराठी रंगभूमी समृद्ध केली. त्यांच्या दिवसेंदिवस, जत्रा आणि अस्मिता यांसारख्या कादंबऱ्यांनाही वाचकांचा उदंड प्रतिसाद लाभला. केवळ पुस्तके आणि रंगभूमीपुरते मर्यादित न राहता, त्यांनी मराठी चित्रपटसृष्टीलाही कळत नकळत आणि तू तिथे मी यांसारख्या दर्जेदार चित्रपटांच्या पटकथा व संवाद देऊन आपली लेखनक्षमता सिद्ध केली. त्यांच्या या अतुलनीय साहित्यिक योगदानाबद्दल त्यांना अनेक मानाच्या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. यामध्ये महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार, विष्णूदास भावे गौरव पदक, राम गणेश गडकरी पुरस्कार आणि ग. दि. माडगूळकर पुरस्काराचा समावेश आहे. तसेच, त्यांना अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविण्याचा बहुमानही मिळाला होता. २५ सप्टेंबर २०१३ रोजी या महान साहित्यिकाने जगाचा निरोप घेतला.

कोकण किनारा हे वृत्तपत्र, मुद्रक प्रकाशक व मालक सौ. तृप्ती श्रीकृष्ण देवरुखकर यांनी सिद्धीविनायक प्रिंटर्स-६३३, कारवांचीवाडी, पोस्ट पोमेंडी बु. ता. जि. रत्नागिरी (महाराष्ट्र) - ४१५६३९ येथून छापून ८२१, स्वरुपानंदन वसाहत खेडशी, रेल्वे स्टेशनजवळ, ता. जि. रत्नागिरी (महाराष्ट्र) ४१५६३९ येथून प्रसिद्ध केले. संपादक - श्री. श्रीकृष्ण तुकाराम देवरुखकर.

महामार्गावरील खड्ड्यांच्या जखमेवर मलमपट्टी

संगमेश्वर : मुंबई-गोवा महामार्गावर चिपळूण ते संगमेश्वर दरम्यान पडलेले खड्डे आणि भेगा भरण्याचे काम सध्या भर उन्हात सुरू आहे. या निकृष्ट मलमपट्टीमुळे सिमेंटचा चुरा होत असून, असुर्डे घाटात रस्त्यावर आलेल्या तुटलेल्या रेलिंगकडेही प्रशासन दुर्लक्ष करत असल्याने प्रवाशांच्या जीवाशी खेळ सुरू आहे.

मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम अद्याप पूर्णत्वास गेले नसतानाच, पूर्ण झालेल्या काँक्रीटच्या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. चिपळूण ते संगमेश्वर या टप्प्यात अनेक ठिकाणी महामार्गाला मोठ्या भेगा पडल्या असून ठिकठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. अनेक ठिकाणी रस्ता कमालीचा खडबडीत झाल्याने वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. या गंभीर समस्येबाबत सातत्याने आवाज उठवल्यानंतर आता प्रशासनाला जाग आली खरी, परंतु ही डागडुजी केवळ नावापुरतीच केली जात असल्याचे समोर येत आहे.

रस्त्याचे काँक्रीटीकरण करताना तांत्रिक आणि शास्त्रीय नियम पाळणे अत्यंत आवश्यक असते. काँक्रीटमधील पाण्याचे बाष्पीभवन वेगाने होऊ नये आणि ते वेळेपूर्वी सुकून त्याला तडे जाऊ नयेत, यासाठी मुख्य काँक्रीटीकरणाचे काम रात्रीच्या



थंड तापमानात केले जाते. इतकी काळजी घेऊनही मुख्य रस्त्याला तडे गेल्याने कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यातच आता हे खड्डे आणि भेगा चक्क दुपारच्या रणरणत्या उन्हात भरल्या जात आहेत. भर उन्हात सिमेंटचे मिश्रण टाकल्याने त्यातील पाण्याचे लगेच बाष्पीभवन होते. शिवाय, या दुरुस्त केलेल्या भागावर नियमानुसार पाणी मारण्याची (क्युरिंग) कोणतीही व्यवस्था केलेली नाही.

परिणामी, काही दिवसांतच या सिमेंटचा चुरा होऊन रस्ता पुन्हा जैसे थे होत आहे. शासनाकडून केवळ वेळ मारून नेऊन वाहनधारक आणि प्रवाशांच्या तोंडाला पाने पुसली जात असल्याचा संताप व्यक्त होत आहे. रात्री शक्य नसेल तर किमान सकाळी लवकर थंड हवेत ही दुरुस्ती का केली जात नाही, असा रास्त सवाल नागरिक विचारत आहेत.

असुर्डे घाटात मृत्यूचा सापळाच तयार झाला आहे. मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या मार्गिकेवर सुमारे ४० फूट लांबीचे लोखंडी सुरक्षा रेलिंग तुटून थेट रस्त्यावर आले आहे. या गंभीर बाबीकडे सार्वजनिक बांधकाम विभाग आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने अद्याप पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे.

हे रेलिंग लोखंडी आणि धारदार असल्याने येथून जाणाऱ्या वाहनांना त्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे. अनेक वाहने या रेलिंगला घासल्याचे प्रकार घडले आहेत. विशेषतः रात्रीच्या अंधारात दुचाकीस्वार या तुटलेल्या लोखंडी पत्र्याला आदळल्यास मोठा अनर्थ घडून जीवितहानी होण्याची शक्यता आहे. प्रशासन एखाद्या मोठ्या अपघाताची वाट पाहत आहे का, असा संतप्त सवाल प्रवाशांमधून उपस्थित केला जात आहे. तरी, चिपळूण-संगमेश्वर दरम्यानची डागडुजी नियमानुसार थंड वेळी करून त्यावर योग्य प्रकारे पाणी मारावे आणि असुर्डे घाटातील तुटलेले रेलिंग तातडीने हटवून दुरुस्त करावे, अशी जोरदार मागणी वाहनचालकांकडून केली जात आहे.

'मेला तो शेवटचा होता' नाटकाने दमदार सुरुवात



स्वामी पिता माऊली चॅरिटेबल ट्रस्ट, कोळंबे, ता. रत्नागिरी निर्मित 'मेला तो शेवटचा होता हे दोन अंकी नाटक, स्पर्धेच्या शुभारंभाच्या दिवशी स्वा. सावरकर नाट्यगृह, रत्नागिरी येथे सादर करण्यात आले. नाटकाचे लेखक विजय खानविलकर असून दिग्दर्शन दशरथ रांगणकर यांनी केले आहे.

पडदा उघडताच... स्मशानजोगी पणाचे (मसनवट्यातील) काम करणारा तुळाप्पा याचे घर त्याच्या घराजवळचे वडाचे झाड त्याला लागून श्रीशंकरांच्या मंदिराची घुमटी व शेजारी असणारे काल्पनिक स्मशानाचा आभास असे असे चित्र उभे करण्यात आले. गावात कोणाचाही मृत्यू झाल्यावर गावातील गावकरी हे मृतव्यक्तीचे प्रेत हे गावातील 'स्मशानजोगी तुळाप्पाच्या दारातील श्रीशंकरांचे मंदिरासमोर आणून ठेवत असत मृत व्यक्तिला मुक्ती मिळावी म्हणून त्याच्यावर अंतीम संस्कार तेथे तुळाप्पा करत असे व प्रेतावर ठेवलेला पिंड तुळाप्पा श्रीशंकरांना प्रार्थना करुन मृतात्म्याला मुक्ती मिळण्यासाठी स्वत: खात असे, त्याच्या या कृतीने मृत व्यक्तिच्या आत्म्याला मुक्ती, शांती मिळते अशी गावकऱ्यांची श्रद्धा असते आणि हे काम करण्यासाठीच तुळाप्पाची नेमणूक सरपंच सुभानराव याने केलेली असते, हे कृत्य करणाऱ्याला व्यक्तिला गावकरी 'स्मशानजोगी म्हणून ओळखत असतात. कोणत्याही शुभ कार्यात त्या कुटुंबाचा सहभाग नसे. याच गावातील ग्रामपंचायतीमध्ये एक सुशिक्षित तरुण भिवाप्पा हा नोकरी निमित्ताने येतो, तो पुढारलेल्या विचारांचा असल्याने तो तुळाप्पा व त्याच्या कुटुंबियांची भेट घेऊन त्यांना या प्रथा बंद झाल्या पाहिजेत तसेच तुमचा मुलगा इंदर व मुलगी अनशी यांनी शिक्षण घेतले पाहिजे असे समजावतो. भिवाप्पाच्या खूप समजावण्यामुळे तुळाप्पा इंदर व अनशी यांना शाळेत जाण्याची परवानगी देतो, ती दोघे शाळेत जाऊ लागतात. जिवंत माणसाने मृतदेहावरचा पिंड खाऊन आत्म्याला मुक्ती मिळते हा भ्रम आहे, शंकरांपासूनच उत्पत्ती झालेला कावळा हा एकमेव प्राणी हे काम करु शकतो , अशी पौराणिक कथाही तो मुलांना ऐकवतो. त्यानंतर मागच्या १७ पिढ्यांनी या अनिष्ट प्रथांचे पालन केले मात्र आमची १८ वी पिढी ह्या अनिष्ट प्रथां व रुढी यापुढे पाळणार नाही, हे विधी मी करणार नाही असे इंदर मनोमन ठरवून टाकतो, सगळ्यांना हे सांगतो. अनिष्ट प्रथांविरोधातील भिवाप्पाचा लढा सुरुच असतो, तो गावात आलेल्या तहसीलदार साहेबांना गावातील अनिष्ट प्रथा व त्यात तुळाप्पाची होणारी आरोग्याची व कुटुंबाची फरफट, या कुटुंबाला गावातील शुभकार्यातून वगळले जाणे या बाबत माहिती देऊन तुळाप्पाच्या वतीने सरकार दरबारी विनंती अर्ज करुन स्मशाना ऐवजी त्याला राहावयास गावाबाहेरची सरकारी जमीन मिळवून देतो. हळूहळू तुळाप्पा यालाही या अनिष्ट प्रथा चुकीच्या असल्याचे पटू लागतात. बदलणाऱ्या या सुधारणावादी घटनांमुळे सरपंच सुभानरावाचा तिळपापड होतो, गावावरील पकड सैल होते की काय ही त्याला भिती असते, ज्या भिवाप्पाला आपणच ग्रामसेवक म्हणून नोकरीला लावले तोच आता गावात जनजागृती करुन आपल्या निर्णयांच्या विरोधात



उभा ठाकला असल्याने भिवाप्पाला प्रथम सुभानराव स्वत:च्या विरोधात जनमत न बनवण्याचे समजुतीने सांगून तो ऐकत नाही असे लक्षात आल्यावर तो त्याचा बंदोबस्त करायचे तो ठरवतो. तुळाप्पा स्मशानात राहात असल्याने तेथील दूषित वातावरणामुळे त्याला दम्याचा त्रास उद्भवतो, त्याचा बापही ह्याच विकाराने त्रस्त होऊन मरण पावलेला असतो, तुळाप्पाला एक दिवस रक्ताच्या उलट्या होऊ लागतात. भिवाप्पा व इंदर त्याला दवाखान्यात घेऊन जातात व घरी अंनशी व तुळाप्पाची बायको गिरीजा असते. त्याचवेळी तेथे सुभानराव येतो तो या सुधारणावादी विचारांचे परिणाम वाईट होतील असे बजावतो, त्याला त्याच ठिकाणी अंनशी बाणेदारपणे प्रतिउत्तर देते व या अनिष्ट प्रथा आमची पिढी आता पाळणार नाही असे बजावते. सुभानरावाचा संताप अनावर होतो व तो आपल्या आड्या या गुंड नोकराकरवी अंनशीला उचलून घेऊन जातो तिच्यावर अत्याचार करुन मारुन टाकतो तसेच भिवाप्पा याचा ही मृत्यू घडवून आणतो. तुळाप्पा व इंदर दवाखान्यातून घरी येतात त्यांना गिरीजा सांगते की, सुभानराव अंशीला बळजबरीने उचलून घेऊन गेले आहेत. हे कळल्यावर तुळाप्पाचा संताप अनावर होतो व तो सुभानरावाला मारण्यासाठी कुऱ्हाड घेऊन बाहेर पडतो मात्र गिरीजा त्याला अडवते. सुभानरावाला तुळाप्पा आपल्या जिवाचे काही बरेवाईट करु शकतो हे कळताच तो तुळाप्पाचा मृत्यू घडवून आणतो व आजारामुळे त्याचा मृत्यू झाल्याचे भासवतो, त्याचे प्रेत हे स्मशानात तुळाप्पाच्या घरासमोर आणले जाते, सुभानराव इंदरला सांगतो तुझ्या बापाचा तुळाप्पाचा मृत्यू झाला आहे आता त्याच्या जाण्याने तू आता स्मशानजोगी झाला आहेस तरी तुळाप्पाच्या आत्म्याला मुक्ती, शांती लाभावी म्हणून आता तू त्याचे क्रियाकर्म करुन पिंड खा म्हणजे त्याला मुक्ती मिळेल, इंदर या गोष्टीला साफ नकार देतो, म्हणून सुभानराव गिरीजाला बजावतो की, तुझ्या नवऱ्याच्या आत्म्याला मुक्ती मिळणार नाही तेव्हा हे क्रियाकर्म आता तू कर, गिरिजा तयार होते सगळे क्रियाकर्म पूर्ण होते मात्र पिंड खाण्याच्या वेळी इंदर तिला अडवतो व पिंड बाजूला फेकतो, तिला पिंड खाण्यापासून मज्जाव करतो, सुभानराव गिरीजाला दरडावतो व ती भितीने पिंड पुन्हा आणून क्रीयाकर्म करते असे सांगताच इंदर तिला सांगतो की, तू पिंड पुन्हा केलास तरी मी तुला तो खाऊ देणार नाही. शेवटी गावकरी व सुभानराव हे तुळाप्पाचे प्रेत तेथेच टाकून निघून जातात. गिरिजा मनोमन ब्रह्मदेवांना प्रार्थना करते की, माझ्या पतीच्या आत्म्याला मुक्ती मिळो. इंदर व गिरिजा तुळाप्पाचे प्रेत तेथून दहनासाठी अन्यत्र नेण्यासाठी उचलतात, तेवढ्यात आकाशातून एक कावळा येतो आणि तो पिंडाला शिवतो व तो पिंड खातो, गिरीजाची विनवणी ब्रह्मदेव ऐकतात, इथेच नाटक संपते. फार वर्षांपूर्वी अशी प्रथा प्रचलीत होत्या, याचा आधार घेऊन, मानवाने मृतात्म्याचा पिंड खाण्याच्या अनिष्ट प्रथेविरोधात या नाटकातून भाष्य केलेले आढळते व शेवटी पुराण कथेचा आधार घेऊन श्रीमहादेवांच्या अंग-मळापासून निर्माण झालेला 'कावळा तुळाप्पा याच्या पिंडाला शिवतो, पिंड खातो असा शेवटही दाखवला आहे. रंगमंचावर प्रत्यक्ष अंत्ययात्रा (तिरडी) आणून परिणामकारकता साधली आहे. नेपथ्यात दोनही अंकात फारसा बदल नाही, तुळाप्पाचे घर, शिवमंदिर, वडाचे झाड एवढेच आहे.

भूमिका आणि कलावंत...

तुळाप्पा-अजित हातिस्कर, सुभानराव-निलेश साळवी, भिवाप्पा-अतुल पाटील, आड्या-मंदार सावंत, गिरीजा-सावली पवार, मेऱ्या-योगेश गुरव, अनशी-गौरी सावंत, कल्लू-आनंद गुरव, इंदर-सुरज पाटील.

नेपथ्य-चिन्मय रांगणकर,
पार्श्वसंगीत-संतोष सनगरे,
रंगभूषा-पल्लवी कीर,
वेशभूषा-सुनील वैद्य,
प्रकाश योजना-अनिकेत गानू

-शब्दांकन : प्रसाद वैद्य

नातूनगर धरणातून डिसेंबरपासून पाणीपुरवठा

खेड : तालुक्यातील नातूनगर धरणातून २५ डिसेंबरपासून पाणीपुरवठा सुरू होणार आहे. यामुळे परिसरातील १४ गावांतील शेतकऱ्यांना रब्बी हंगामातील दुबार पिकांसाठी फायदा होणार असून जमीन लागवडीखाली येईल. तसेच नळपाणी योजनांच्या विहिरींची भूजल पातळी वाढण्यास मदत होईल.

शेतकऱ्यांच्या मागणीनुसार आणि उपलब्ध साठ्यानुसार २५ नोव्हेंबरपासून कालव्यातून पाणी सोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

मेटाच्या कार्यालयाबाहेर युवक काँग्रेसचे आंदोलन

मुंबई : भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाविरोधात आवाज उठवणाऱ्यांची सोशल मीडिया खाती निलंबित करून लोकशाहीवादी आवाज दडपण्याचा प्रयत्न केला जात असल्याच्या निषेधार्थ मुंबई युवक काँग्रेसच्या वतीने बीकेसी येथील वर्ल्ड वनमधील मेटाच्या कार्यालयाबाहेर जोरदार आंदोलन करण्यात आले. अध्यक्षा झीनत शबरीन यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांचे पोस्टर जाळून निषेध व्यक्त केला.

भारतीय युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय भानू चिब आणि राष्ट्रीय प्रभारी मनिष शर्मा यांची सोशल मीडिया खाती निलंबित



करण्यात आल्याची घटना म्हणजे विरोधी विचारांचा आवाज दडपण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. सोशल मीडियाच्या माध्यमातून सरकारला प्रश्न विचारणाऱ्या आणि विरोधी मते मांडणाऱ्यांचे आवाज बंद करण्याच्या या कारवाईचा तीव्र निषेध करण्यात आला. लोकशाहीत सरकारला प्रश्न विचारण्याचा आणि आपले मत मांडण्याचा प्रत्येक नागरिकाला अधिकार आहे. सोशल मीडिया अकाउंट निलंबित करून हा अधिकार हिरावून घेण्याचे प्रयत्न खपवून घेतले जाणार नाहीत, असा इशारा मुंबई युवक काँग्रेसच्या अध्यक्षा झीनत शबरीन यांनी दिला. यावेळी भाजपाचा बेटा अशा घोषणा देण्यात आल्या

या आंदोलनात मुंबई युवक काँग्रेसचे प्रभारी पवन मजीठिया, प्रदेश महासचिव अमनदीप सैनी, उत्तर मध्य जिल्हाध्यक्ष निखिल रुपारेल, उत्तर पश्चिम जिल्हाध्यक्ष अब्दुल समद, उत्तर पूर्व जिल्हाध्यक्ष शेखर जगताप, विधानसभा अध्यक्ष विकास जयस्वाल, आशिष सरोज, राहुल पेडणेकर, शिवेंद्र घोरपडे यांच्यासह मुंबई युवक काँग्रेसचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

लोकशाहीवादी आवाज दडपण्याच्या कोणत्याही प्रयत्नाविरोधात युवक काँग्रेसचा संघर्ष सुरूच राहील, असेही झीनत शबरीन यांनी सांगितले .

नामजोशी कॉलेजचे विद्यार्थी जिल्हास्तरावर चमकले

संगमेश्वर : तालुक्यातील माखजन पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाच्या ॲड.पी.आर. नामजोशी कला वाणिज्य विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय व माखजन इंग्लिश स्कूल माखजन च्या विद्यार्थी रत्नागिरी येथे झालेल्या विविध जिल्हा स्तरीय स्पर्धानमध्ये चमकले आहेत.

युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय भारत सरकार यांच्यामार्फत दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय युवा महोत्सवाचे यंदा विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग(व्ही.बी. वाय.एल.डी २०२७) मध्ये रूपांतरण करण्यात आले आहे. या उपक्रमाच्या अनुषंगाने क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा







परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,रत्नागिरी यांचे तर्फे जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

या महोत्सवात १५ ते २९ वर्षे वयोगटातील अनेक तरुण तरुणी या महोत्सवात विविध स्पर्धात सहभागी झाले होते.यामध्ये ॲड. पी.आर.नामजोशी कला वाणिज्य विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय व माखजन इंग्लिश स्कूल च्या विद्यार्थ्यांनी लोकगीत स्पर्धे मध्ये मुलींनी प्रथम क्रमांक पटकावला. तर लोकनृत्य स्पर्धेत मुलग्यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. तर चित्रकला स्पर्धेत सिमरन चांदिवडे हिने द्वितीय क्रमांक मिळवला.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना प्रा.आरजू बेग,गणेश शिंदे यांनी मार्गदर्शन केले.यशस्वी विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक महादेव परब,पर्यवेक्षक अंबादास घाडगे,संस्था अध्यक्ष शशिकांत घाणेकर,उपाध्यक्ष राजेश फणसे व अन्य संचालकांनी अभिनंदन केले आहे.शिवाय परिसरातून विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.

जनतेची कामे मार्गी लावा; दिरंगाई खपवून घेणार नाही

राजापूर : सर्वसामान्य जनतेची कामे मार्गी लावणे हे प्रशासनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रथम प्राधान्य असले पाहिजे. कामातील दिरंगाई आणि बेफिकिरीबद्दल आमदार किरण सामंत यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत अधिकाऱ्यांची झाडाझडती घेतली.

राजापूर तालुक्याची आमसभा २६ नोव्हेंबर रोजी गुजराळी येथील श्रीमंगल कार्यालयात होणार आहे. या पार्श्वभूमीवर किसान भवन सभागृहात झालेल्या प्रशासकीय आढावा बैठकीत सभापती नंदिनी कदम, उपसभापती अभिजित गुरव, प्रांताधिकारी विश्वजित गाताडे, तहसीलदार विकास गंबरे, गटविकास अधिकारी रोहित कुंभार व पोलीस निरीक्षक अमित यादव उपस्थित होते. आमसभेत उपस्थित होणाऱ्या प्रश्नांवर केवळ चर्चा न करता विभागांनी त्याआधीच आढावा घेऊन तत्परतेने कार्यवाही करावी, अशा स्पष्ट सूचना आमदार सामंत यांनी दिल्या. लोकांच्या समस्या सोडवणे हे कर्तव्य असून प्रशासनाने गंभीर राहावे, असेही त्यांनी सुनावले. खून व चोरीच्या तपासातील दिरंगाई, गोवा बनावटीची दारू विक्री, तसेच नागरिकांना पोलिसांकडून मिळणारी वागणूक व त्रास यावरून त्यांनी पोलिसांना जाब विचारला. राजापूर व नाटे पोलीस ठाण्यांबाबतच्या तक्रारींची दखल घेत त्या गांभीर्याने सोडवण्याचे आदेश त्यांनी दिले.

निवृत्तीवेतनधारकांसाठी ३० नोव्हेंबरपर्यंत डिजिटल जीवन प्रमाणपत्र सुविधा

रत्नागिरी : जिल्ह्यातील राज्य शासकीय निवृत्तीवेतनधारक आणि कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना घरबसल्या किंवा जवळच्या कोषागार कार्यालयातून हयातीचा दाखला सादर करता यावा, यासाठी प्रशासनाने तयारी केली आहे. पात्र लाभार्थ्यांनी वेळेत या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

केंद्र शासनाच्या पेन्शन आणि पेन्शनधारक कल्याण विभागामार्फत पाचवी राष्ट्रव्यापी डिजिटल जीवन प्रमाणपत्र मोहीम राबविण्यात येत आहे. याअंतर्गत रत्नागिरी जिल्ह्यातील कोषागार आणि उपकोषागारांमध्ये ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत निवृत्तीवेतनधारकांना Jeevan Pramaan Face App आणि Aadhaar Face Rd या मोबाइल ॲप्सद्वारे चेहरा पडताळणी (Face Authentication) करून डिजिटल पद्धतीने हयातीचा दाखला सादर करता येणार आहे. यामुळे ज्येष्ठ नागरिकांची बँकांच्या रांगांमधून सुटका होणार आहे.

ज्या पेन्शनधारकांनी यापूर्वी बँकेत प्रत्यक्ष स्वाक्षरी करून प्रचलित पद्धतीने दाखला दिला आहे, त्यांनीही या आधुनिक प्रणालीचा अवलंब करावा. त्यासाठी जिल्हा कोषागार किंवा उपकोषागारांशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी प्रविंद बिरादार यांनी केले आहे. जिल्ह्यातील सर्व राज्य शासकीय निवृत्तीवेतनधारक आणि कुटुंब निवृत्तीवेतनधारकांनी कोणत्याही अडचणीशिवाय पेन्शन सुरू राहण्यासाठी ३० नोव्हेंबरपूर्वी या विशेष मोहिमेचा लाभ घ्यावा, असे जिल्हा प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

जांभा दगडावर ३०टक्के रॉयल्टी माफ

चिरेखाणींना मिळणार नैसर्गिक तलावाचा दर्जा; आमदार भास्कर जाधव यांच्या पाठपुराव्याला यश

गुहागर : कोकणातील चिरेखाण व्यावसायिक आणि स्थानिक शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरलेल्या गौण खनिज समितीच्या बैठकीत आमदार भास्कर जाधव यांनी मांडलेल्या प्रमुख मागण्यांना यश आले आहे. या बैठकीत जांभा दगडावरील ३० टक्के रॉयल्टी सरसकट माफ करण्याचा आणि उत्खननानंतर तयार होणाऱ्या चिरेखाणींना नैसर्गिक तलावाचा दर्जा देऊन त्यासाठी शासनामार्फत ताडपत्री पुरवण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे.

राज्याच्या गौण खनिज नियमावलीत सुधारणा करण्याबाबत शासनाने नेमलेल्या समितीची तिसरी बैठक महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत समितीचे सदस्य या नात्याने आमदार भास्कर जाधव हे दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते. कोकणातील रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या दोनच जिल्ह्यांमध्ये जांभा दगडाचे उत्खनन केले जाते. हा दगड मातीच्या खाली असल्याने तो काढताना निम्म्याहून अधिक दगड फुटतो आणि त्यामुळे व्यावसायिकांचे मोठे आर्थिक नुकसान होते. ही वस्तुस्थिती जाधव यांनी समितीसमोर मांडत जांभा दगडावर ३० टक्के रॉयल्टी सरसकट माफ करण्याची मागणी केली, जी समितीने तात्काळ मान्य केली.

जांभा दगड काढल्यानंतर निर्माण होणाऱ्या खाणी बुजवण्याचे बंधन घालण्याऐवजी त्यांना नैसर्गिक तलाव समजावे, अशी महत्त्वपूर्ण सूचनाही जाधव यांनी केली. पावसाळ्यात या खाणींमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी



साचते. सरकारतर्फे ताडपत्री उपलब्ध करून दिल्यास या खाणींमध्ये उत्तम प्रकारे पाणीसाठा होईल आणि नैसर्गिक तलाव तयार होतील. या साठवलेल्या पाण्यामुळे परिसरातील विहिरी व बोअरवेलची पाणीपातळी वाढेल आणि त्याचा थेट फायदा काजू, साग, खैर यांसारख्या फळबागा व वृक्षलागवडीसाठी होईल. हा मुद्दा आणि खाणींसाठी ताडपत्री देण्याचा प्रस्ताव देखील समितीने मान्य केला आहे.

रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या दोन्ही जिल्ह्यांतील चिरेखाणींमधून शासनाला केवळ १२ ते १३ कोटी रुपये तर वाळू उत्खननातून केवळ ४ ते ५ कोटी रुपये इतकीच रॉयल्टी मिळते. मात्र, यापोटी व्यावसायिकांना अधिकाऱ्यांचा मोठा त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे कोकणातील चिरेखाणी आणि वाळूची रॉयल्टी कायमस्वरूपी माफ करावी, असा प्रस्तावही जाधव यांनी मांडला असून त्यासाठी त्यांचा पाठपुरावा सुरू आहे. नजीकच्या काळात या मागणीलाही यश येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कोकणी माणसाची आर्थिक परिस्थिती सुधारावी यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील असल्याच्या भावना आमदार भास्कर जाधव यांनी व्यक्त केल्या.

मुंबई माजी पोलीस आयुक्तांच्या दापोलीतील बागेला आग, १५ लाखांचे नुकसान

दापोली : तालुक्यातील कुंभवे येथील काजूच्या बागेला आग लागून सुमारे १५ लाख रुपयांचे नुकसान झाल्याची घटना समोर आली आहे. या आगीत १५ वर्षापूर्वी लागवड केलेली ७२० काजूची झाडे होरपळून गेली असून झाडांना पाणीपुरवठा करण्यासाठी उभारलेली पाइपलाइन जळून खाक झाली आहे. या प्रकरणी दापोली पोलीस ठाण्यात अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मुंबईचे माजी पोलीस आयुक्त हेमंत नामदेवराव नगराळे यांची कुंभवे येथे शेत जमीन (बाग) आहे. तसेच हेमंत नगराळे यांनी रत्नागिरी जिल्हयाचे पोलीस अधीक्षक म्हणून काम पाहिले आहे. त्यांच्या बागेत दयानंद गोविंद रुके (वय ५२, रा. साखळोली, ता. दापोली) हे बागेच्या देखभालीचे काम करतात.

रुके यांनी दिलेल्या तक्रारीत, ते १२ नोव्हेंबर रोजी सकाळी १०.१५ वाजण्याच्या सुमारास कुंभवे येथील काजू बागेची पाहणी करून घरी परतले होते. त्यानंतर १८ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास ते पुन्हा बागेत गेले असता सुमारे आठ एकर क्षेत्रात असलेली काजूची ७२० झाडे आगीने होरपळून गेली होती. तसेच झाडांना पाणी देण्यासाठी बसविण्यात आलेली पाइपलाइन पूर्णपणे जळून गेल्याचे त्यांचे निदर्शनास आले. कोणीतरी अज्ञात व्यक्तीने काजू बागेतील वाळलेल्या गवताला आग लावल्यामुळे ही घटना घडल्याचा संशय फिर्यादीने व्यक्त केला आहे.

या आगीत सुमारे १० लाख रुपये किमतीची काजूची झाडे आणि पाच लाख रुपये किमतीची पाइपलाइन असे एकूण १५ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी दापोली पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३२६ (एफ) प्रमाणे अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा अधिक तपास उपनिरीक्षक हेमराज निर्मळ करत आहेत.

पोलीस डायरी

वाहतुकीस अडथळा, दोघांवर गुन्हे

दापोली / मंडणगड : सार्वजनिक रस्त्यावर रहदारीस आणि पादचाऱ्यांना धोका निर्माण होईल अशा पद्धतीने वाहने उभी केल्याप्रकरणी दाभोळ आणि बाणकोट सागरी पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. **दाभोळ :** १९ नोव्हेंबर रोजी दुपारी २ वाजता दाभोळ ते दापोली जाणाऱ्या रोडवर भिवबंदर फाटा येथे संदेश शंकर कुलाबकर (वय ५६, रा. दाभोळ खडपकरवाडी, ता. दापोली) याने आपली रिक्षा (क्र. एमएच-०८/व्ही-२०५४) रहदारीस अडथळा होईल अशा स्थितीत उभी केली होती. गुन्हा दाखल करण्यात आला आहे. **मंडणगड :** १९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास बाणकोट ते देव्हारे जाणाऱ्या रोडवर वेसवी नाका येथील गरीब नवाज बिर्याणी दुकानासमोर मिलिंद मुरलीधर पाटील (रा. वेळास, ता. मंडणगड) याने आपली मारुती इको कार (क्र. एमएच-०१/डीबी-२१९३) धोकादायक स्थितीत उभी करून वाहतुकीस अडथळा निर्माण केला. पोलीस कॉन्स्टेबल राजेश तांबे यांच्या फिर्यादीवरून बाणकोट सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

रोडवर बेशुद्ध अवस्थेत आढळलेल्या तरुणाचा मृत्यू

दापोली : तालुक्यातील काळकाई कोंड येथील रस्त्यावर बेशुद्ध अवस्थेत पडलेल्या ४० वर्षीय तरुणाचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याची घटना १९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी घडली. याप्रकरणी दापोली पोलीस ठाण्यात अकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. उमेश मारुती धोत्रे (४०, रा. सकोंडी बौद्धवाडी, ता. दापोली) असे मयत तरुणाचे नाव आहे. १९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास उमेश हे काळकाई कोंड येथील रोडवर बेशुद्ध अवस्थेत पडलेले आढळून आले होते. त्यांचे मामा संतोष शंकर सक्रे यांनी त्यांना तातडीने उपचारासाठी दापोली उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, तेथील डॉक्टरांनी तपासून सायंकाळी ७ वाजता त्यांना मृत घोषित केले.

बेदरकारपणे पाण्याचा टँकर चालवणाऱ्यावर गुन्हा

रत्नागिरी : कारवांचीवाडी फाटा ते कुवारबाव जाणाऱ्या महामार्गाजवळील बायपास रस्त्यावर बेदरकारपणे आणि वेगात आयशर पाण्याची गाडी चालवून समोरील वाहनांना धोका निर्माण केल्याप्रकरणी रत्नागिरी ग्रामीण पोलिसांनी एका चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. १९ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.५० वाजण्याच्या सुमारास आरोपी हर्ष शरद लिंगायत (वय २३, रा. मजगांव, ता. जि. रत्नागिरी) हा आपल्या ताब्यातील आयशर पाण्याची गाडी (क्र. एमएच-०८/एपी-३३७५) अतिवेगात व बेदरकारपणे चालवताना मिळून आला.

अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू; मयतावरच गुन्हा दाखल

रत्नागिरी : पाली ते नाणीज मार्गावर भरधाव वेगात व निष्काळजीपणे दुचाकी चालवताना रस्त्यावरील स्पीड ब्रेकरसाठी लावलेल्या बॅरलला धडकून गंभीर जखमी झालेल्या दुचाकीस्वाराचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. या अपघातास स्वतः कारणीभूत ठरल्याप्रकरणी रत्नागिरी ग्रामीण पोलीस ठाण्यात मयत चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विश्वास रामदास रसाळ (४३, रा. नाणीज, ता. जि. रत्नागिरी) असे मयत दुचाकीस्वाराचे नाव आहे. १८ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री ८.३० वाजण्याच्या सुमारास ते आपल्या ताब्यातील दुचाकी (क्रमांक एमएच-०८/पी-२०५८) घेऊन पाली ते नाणीज असे येत होते. नाणीज जुना मठ येथे रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करत अतिवेगात गाडी चालवल्याने त्यांची दुचाकी स्पीड ब्रेकरसाठी ठेवलेल्या बॅरलवर आदळली. या अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. त्यांना प्रथम पाली ग्रामीण रुग्णालय, त्यानंतर रत्नागिरीतील परकार हॉस्पिटल आणि अधिक उपचारासाठी कोल्हापूर येथील ॲस्टर आधार हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचार सुरू असताना २२ ऑक्टोबर रोजी रात्री १.४५ वाजता त्यांचा मृत्यू झाला.

दापोलीत सलूनमध्ये दाढी करणाऱ्या व्यावसायिकावर लाकडी पट्टीने हल्ला

दापोली : तालुक्यातील गावतळे हनुमानवाडी येथील एका सलूनमध्ये ग्राहकाची दाढी करत असलेल्या व्यावसायिकाला मद्यधुंद तरुणाने पाठीमागून येऊन लाकडी पट्टीने मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी दापोली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. शुभम संतोष शिंदे (वय ३०, रा. गावतळे हनुमानवाडी, ता. दापोली) असे जखमी सलून व्यावसायिकाचे नाव आहे. १९ नोव्हेंबर रोजी दुपारी १.१५ वाजण्याच्या सुमारास ते आपल्या सलूनमध्ये एका ग्राहकाची दाढी करत होते. ते पाठमोरे असल्याची संधी साधून त्याच वाडीतील सौरभ भार्गराम म्हाब्दी (वय २८) हा दारू पिऊन तेथे आला आणि हातातील लाकडी रिपने (पट्टीने) शुभम यांच्या पाठीवर व डाव्या हाताच्या पंजावर मारहाण केली.

राजापूर परिसरात अवैध दारू विक्री, साठा करणाऱ्या तिघांवर पोलिसांचे छापे

राजापूर : येथील पोलिसांनी १८ नोव्हेंबर रोजी रात्रीच्या सुमारास तीन वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकून गावठी हातभट्टी, देशी तसेच गोवा व महाराष्ट्र बनावटीची विदेशी दारू असा एकूण ८ हजार ४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून तिघांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हे दाखल केले आहेत. राजापूर रेल्वे स्टेशन परिसरात हातभट्टीची दारू जप्त: १८ नोव्हेंबर रोजी रात्री ८.२७ वाजता राजापूर रेल्वे स्टेशन येथील गोविंद सौंदळकर यांच्या घरामागील पार्किंग शेडमध्ये सुधिर श्रीधर पोटले (वय ५५, रा. जांभवली वरचीवाडी, ता. राजापूर) याच्याकडून १३०० रुपये किमतीची १० लिटर गावठी हातभट्टीची दारू व स्टीलचा ग्लास असा १,३२० रुपयांचा माल जप्त करण्यात आला. मौजे सोल्ये येथे ५,७६० रुपयांची दारू जप्त: १८ नोव्हेंबर रोजी रात्री ८.४१ वाजता मौजे सोल्ये (राजापूर रेल्वे स्टेशनसमोर) येथील हॉटेल सिद्धेश चायनिज सेंटरच्या मागील शेडखाली नितीन राजाराम शिंदे (वय ५५, रा. सोल्ये, ता. राजापूर) याच्याकडून गोवा व महाराष्ट्र बनावटीच्या व्होडका, ब्रँडी, व्हिस्की आणि बिअरच्या बाटल्या व टिन असा एकूण ५,७६० रुपयांचा साठा जप्त करण्यात आला. कळसवली वाणीवाडीत देशी दारू जप्त: १८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७.३० वाजता कळसवली वाणीवाडी येथे सुनिल केशव सुवरे (वय ४४, रा. कळसवली वाणीवाडी) याच्या ताब्यातून निळ्या पिशवीत विक्रीसाठी ठेवलेली फॅनी व्हिस्की देशी दारूच्या १८० मि.ली. मापाच्या १२ सिलबंद बाटल्या (किंमत ९६० रुपये) जप्त करण्यात आल्या.

राजापूर बाजारपेठेतील अतिक्रमण स्वत:हून हटवा; अन्यथा पालिका कारवाई करणार

राजापूर : शहरातील बाजारपेठेच्या मुख्य रस्त्यावरील अतिक्रमणे, दुकानांसमोरील बांधलेल्या पायऱ्या आणि पावसाळ्यासाठी उभारलेल्या झड्या व्यापाऱ्यांनी स्वत:हून हटवाव्यात, अन्यथा नगरपालिकेकडून धडक कारवाई करण्यात येईल, असा सज्जड इशारा मुख्याधिकारी अभिजीत कुंभार यांनी दिला आहे. तसेच कारवाईत अडथळा आणणाऱ्यांविरोधात प्रसंगी गुन्हा दाखल करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पालिकेने दोन दिवसांपूर्वी सुरू केलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेच्या पार्श्वभूमीवर व्यापाऱ्यांच्या मागणीनुसार आज प्रशासनासोबत बैठक पार पडली. यावेळी वाहतुकीला अडथळा ठरणारे अतिक्रमण कोणाचेही असो, त्यावर कारवाई होईल, अशी ठाम भूमिका कुंभार यांनी मांडली.

व्यापारी संघाचे अध्यक्ष संदीप मालपेकर यांनी अतिक्रमण कारवाईला विरोध नसल्याचे सांगत व्यापाऱ्यांच्या अडचणी समजून घेण्याची, झड्यांची उंची निश्चित करण्याची तसेच आठवडा बाजाराला शिस्त लावण्याची मागणी केली. दिनानाथ कोळवणकर यांनी लोंबकळणाऱ्या वीजवाहिन्यांकडे लक्ष वेधले, तर प्रशांत पवार यांनी दुकानांसमोर दुचाकी पार्क न करण्याची सूचना केली. यावर महावितरणशी संपर्क साधून वीजवाहिन्यांचा प्रश्न सोडवण्याचे आणि आठवडा बाजाराबाबत स्वतंत्र बैठक घेण्याचे आश्वासन मुख्याधिकाऱ्यांनी दिले. व्यापारी प्रतिनिधींसमवेत प्रत्यक्ष पाहणी करून पुढील सूचना देण्याचे बैठकीत ठरले.

बैठकीस पोलिस निरीक्षक अतिम यादव, पाणीपुरवठा सभापती सौरभ खडपे, नगरसेवक सुलतान ठाकूर, व्यापारी संघाचे अध्यक्ष संदीप मालपेकर, राजेंद्र नवाळे, विवेक गादीकर, आजीम जैतापकर, कार्यालयीन अधीक्षक जितेंद्र जाधव यांच्यासह व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनतेची कामे मार्गी लावा; दिरंगाई खपवून घेणार नाही

राजापूर : सर्वसामान्य जनतेची कामे मार्गी लावणे हे प्रशासनाचे प्राधान्य असले पाहिजे. कामातील दिरंगाई आणि बेफिकिरीबद्दल आमदार किरण सामंत यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत अधिकाऱ्यांची झाडाझडती घेतली. गुरुवार, २६ नोव्हेंबर रोजी गुजराळी येथील श्रीमंगल कार्यालयात होणाऱ्या राजापूर तालुका आमसभेच्या पार्श्वभूमीवर पंचायत समितीच्या किसान भवन सभागृहात आढावा बैठक झाली. तालुक्यातील समस्यांचा आढावा घेत जनतेचे प्रश्न सोडवण्याबाबत प्रशासनाने गंभीर राहावे, अशा सूचना सामंत यांनी दिल्या. बैठकीस सभापती नंदिनी कदम, उपसभापती अभिजित गुरव, प्रांताधिकारी विश्वजित गाताडे, तहसीलदार विकास गंबरे, गटविकास अधिकारी रोहित कुंभार, पोलीस निरीक्षक अमित यादव आदी उपस्थित होते.

मुझम्मील काझी यांना राज्यस्तरीय 'समाज रत्न' पुरस्कार जाहीर

रत्नागिरी : ग्रामीण भागातील ज्वलंत प्रश्न आणि सर्वसामान्य नागरिकांच्या समस्यांना आपल्या लेखणीतून वाचा फोडणारे युवा पत्रकार तथा 'ग्रामीण वार्ता डिजिटल मीडिया'चे संपादक मुझम्मील काझी यांना दोन राज्यस्तरीय 'समाज रत्न' पुरस्कार जाहीर झाले आहेत. डिजिटल पत्रकारितेच्या माध्यमातून जनहिताचे प्रश्न प्रशासनापर्यंत पोहोचवून त्यांच्या निराकरणासाठी सातत्याने पाठपुरावा केल्याबद्दल त्यांना हा सन्मान मिळत आहे. यापूर्वी त्यांना नऊ वेळा राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. 'वर्ल्ड फॉर नेचर इंडिया'च्या रत्नागिरी शाखेतर्फे 'निसर्ग मित्र मेळावा व दुसरा राज्यस्तरीय सन्मान सोहळा २०२६' मध्ये, तर मंथन फाऊंडेशन, कपिलेश्वरतर्फे ५ डिसेंबर रोजी कोल्हापूर येथे त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

